# सूचना

सचिवालय जिमखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा खालील कामकाजासाठी शुक्रवार दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता कै. सुधीर अवचट सभागृह, सचिवालय जिमखाना, मुंबई येथे होईल.

१) सचिवालय जिमखान्याच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्तांत मंजूर करणे.

२) सन २०१६-१७ चा वार्षिक अहवाल व परिक्षित लेखा विवरणपत्र आणि ताळेबंद सभेपुढे सादर करणे व त्यास मंजूरी देणे.

३) कार्यकारी समितीवर ४ (चार) सभासदांची निवड करणे.

४) सन २०१७-१८ करिता लेखा परिक्षकांची नियुक्ती करणे.

५) अध्यक्षांच्या समंतीने इतर कामकाज.

दिनांक ९ ऑगस्ट, २०१७

(प्रकाश चौधरी)
मानद सह सचिव

---

**टीप:-**

१ दुपारी ३.०० वाजता सुरु झालेली बैठक निवडणूक प्रक्रियेसाठी सायं. ४ ते ७.३० वाजेपर्यन्त स्थगित करण्यात येईल.

२ गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास तहकूब केलेल्या वेळेपासून ३० मिनिटानंतर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी घेण्यात येईल. अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

३ सर्व सभासदांनी कृपया दुपारी ३.०० वाजता सभेला उपस्थित रहावे.

४ सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांना लेख्याबाबत विशिष्ट माहिती हवी असल्यास त्यांनी जिमखाना व्यवस्थापकांकडे दिनांक १६ सप्टेंबर, २०१७ पर्यन्त त्यासंबंधीत लेखी निवेदन द्यावे.

५ सर्व सभासदांनी सचिवालय जिमखान्याने दिलेले ओळखपत्र सभेला येताना कृपया सोबत आणावीत. ज्या सभासदांनी ओळखपत्र मिळण्यासाठी त्यांच्या फोटोच्या (३.१x४.१ से.मी.आकाराच्या) दोन प्रती अद्याप दिलेल्या नसतील, तर त्यांनी त्या जिमखाना कार्यालयांत कृपया तात्काळ द्याव्यात, म्हणजे त्यांना ओळखपत्र देणे शक्य होईल.

६ ज्या सभासदांकडे जिमखान्याने दिलेले ओळखपत्र नसेल त्यांनी स्वत:ची ओळख पटविण्यासाठी कृपया निवडणूक आयुक्तांनी दिलेले ओळखपत्र किवा कार्यालयाचे ओळखपत्र आणावे.

**टीप :- मतदानाचा हक्क फक्त ३१ मार्च, २०१७ पूर्वी झालेल्या आजीव सभासदांनाच राहिल. ज्या आजीव सभासदांची मार्च, २०१७ पर्यन्तची वर्गणी थकीत आहे, त्यांनी निवडणूकीपूर्वी संपूर्ण थकीत रक्कम भरावी, अन्यथा सदर सभासदास मतदान करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**